# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक

**विषय : एम.फिल / पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठीच्या मुदतवाढीबाबत.**
**(M. Phil./Ph. D. Admission 2017-2018).**

एम.फिल./पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व संलग्नित मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथे प्रवेश प्रक्रिया सुरू करावयाची आहे. याकरिता मान्यताप्राप्त मार्गदर्शकांकडून रिक्त जागांची माहिती दि. ११/०३/२०१७ ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेली आहे. तथापी, अद्यापही काही मार्गदर्शकांनी रिक्त जागांची माहिती अद्ययावत केलेली नाही.

यासंदर्भात पुनश्चः कळविण्यात येते की, मान्यताप्राप्त मार्गदर्शकानी विद्यापीठाच्या **bcud.unipune.ac.in** या संकेतस्थळावरून रिक्त जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठी **दि. १९/०३/२०१७** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असुन आपली माहिती स्व:ताच्या Teacher Login मध्ये भरून संबधित संशोधन केंद्रामार्फत शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे जमा करावी.

<u>मार्गदर्शकांसाठी ऑनलाईन प्रक्रिया :—</u>

- मार्गदर्शकानी आपल्या BCUD Online च्या Teacher Login व्दारे Login करावे.
- Login झाल्यानंतर Vacant Position for M.Phil./Ph.D. Admission 2017-2018 या मधुन Link Open करावी.
- Declare Vacancies या टेबल मधील Edit बटणावर Click करावे.
- मार्गदर्शकांना रिक्त जागांची माहिती भरताना खालील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे.
    - Approval संदर्भाची माहिती Teacher Profile मध्ये अद्ययावत असावी.
    - PG Recognition/Research Guide Details संदर्भातील माहिती Teacher Profile मध्ये अद्ययावत असावी.
- मार्गदर्शकाकडे संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी Ph. D. Tracking System मध्ये Online नोंदणी केलेली असेल व ते संशोधन केंद्राने Confirm केले असल्यास अशा विद्यार्थ्यांची माहिती Current Registered Students For Ph.D. येथे दिसून येतील. आपल्या पदाप्रमाणे लागू असलेल्या विद्यार्थी संख्येपैकी वरील नोंदणीकृत विद्यार्थी संख्या वगळून उरलेल्या जागांसाठी आपणांस Vacancy Declare करता येईल. त्यानुसार आपण मार्गदर्शन करू इच्छित विद्यार्थ्यांची संख्या दिलेल्या Dropdown मधुन निवडून Save करावी. त्याचप्रमाणे मार्गदर्शक म्हणून संलग्नित असलेल्या संशोधन केंद्र/विद्यापीठ विभागाचा PUNCODE टाकावा.
- आपण M.Phil. अभ्यासक्रमासाठी मान्यताप्राप्त मार्गदर्शक असल्यास आपल्याकडे संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या प्रवर्गानुसार भरावी. सदर माहिती भरल्यानंतर आपल्या पदाप्रमाणे लागू असलेल्या विद्यार्थी संख्येपैकी वरील नोंदणीकृत विद्यार्थी संख्या वगळून उरलेल्या जागांसाठी आपणांस Vacancy Declare करता येईल.

—२

संशोधन केंद्र/संस्था/विद्यापीठ विभागासाठी ऑनलाईन प्रक्रिया :—

- संशोधन केंद्र/संस्था/विद्यापीठ विभाग अंतर्गत ज्या मार्गदर्शकानी ऑनलाईन माहिती भरलेली असेल अशा मार्गदर्शकांची माहिती Confirm Button करून स्वीकारावी.
- मार्गदर्शकाचे नाव Confirm केल्यानंतर आपणांस मार्गदर्शकाच्या माहितीमध्ये बदल करता येणार नाही.
- सर्व मार्गदर्शकांची माहिती अद्ययावत करून त्याची यादी शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे विहित मुदतीत जमा करावी.

University Grants Commission (Minimum Standards and Procedure for award of M.Phil./Ph.D. Degree) Regulation 2016 मध्ये शिक्षकांच्या संवर्गनिहाय संशोधनासाठी घ्यावयाच्या विद्यार्थी संख्येबाबत तरतुद केलेली आहे. त्यानुसार मार्गदर्शकांनी आपल्याकडे संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊन रिक्त जागांची माहिती अद्ययावत करावी.

मार्गदर्शकानी संशोधन केंद्रामार्फत Vacant Position for M.Phil./Ph.D. Admission 2017-2018 मध्ये नोंदणी करणे बंधनकारक असुन नोंदणी नसलेल्या मार्गदर्शकांची पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेची पुढील कोणतीही प्रक्रिया केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क :—

- मोबाईल क्रमांक :— 7038408091
- ई—मेल आयडी :— phdtracking_support@pun.unipune.ac.in

10/3/2017

उपकुलसचिव,
**शैक्षणिक प्रवेश विभाग**

गणेशखिंड, पुणे — ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/१०१९
दिनांक : १०/०३/२०१७

प्रत :—

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागात/संशोधन केंद्रातील मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून देण्यात येऊन उपरोक्त दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.